ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research






# पु. लं. नी साकारलेली स्वचित्रणे आणि व्यक्तिचित्रणे : एक दृष्टिक्षेप
## ('पुरचुंडी' आणि 'मैत्र' यांच्या संदर्भात)

डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे,पुणे.

**सारांश–**

पु. ल. देशपांडे यांनी साहित्यक्षेत्रात केलेली भ्रमंती विविधरंगी आहे. त्यावर नजर टाकली तर लक्षात येते की ही भ्रमंती पु.ल.देशपांडे नावाच्या एकाच व्यक्तिमत्वात दडलेल्या अनेक व्यक्तिमत्त्वांची भ्रमंती आहे. ललामभूत असणारी माणसे त्यांनी शब्दांमधून जिवंत केली. तशाच प्रकारे काल्पनिक आणि प्रत्यक्ष भेटलेल्या व्यक्तींनाही त्यांनी साकार केले. त्यांच्या गुणांवर विशेष जोर देत त्यांनी त्या–त्या व्यक्ती सजीव केल्या आहेत. घटनाप्रसंग आणि मनःस्थिती किंवा भावावस्था यांचा उपयोग ते अत्यंत कौशल्याने करताना दिसतात. त्यांच्या एकंदर साहित्यकृतींवरून हे चटकन लक्षात येते.

**प्रस्तावना–**

पु. ल. देशपांडे यांनी 'खोगीर भरती', 'नस्ती उठाठेव', 'बटाट्याची चाळ', 'गोळा बेरीज', 'असा मी असा मी', 'हसवणूक', 'खिल्ली', 'अघळपघळ', 'पुरचुंडी', 'उरलंसुरलं', 'मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास' हे विनोदी लेखसंग्रह लिहिले आहेत. तसेच त्यांनी व्यक्तिचित्रणे देखील लिहिली आहेत. त्यामध्ये 'व्यक्ती आणि वल्ली', 'गणगोत' आणि 'मैत्र' या लेखनकृतींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे 'एक शून्य मी' हे वैचारिक लेखाच्या पुस्तकाचा समावेश आहे.

पु.ल. देशपांडे यांचे स्वविचार, तत्त्वे यांचे स्पष्ट चित्र त्यांच्या भाषणांमधून उभे राहते. त्यांनी दिलेल्या भाषणांची, व्याख्यानांची पुस्तके उपलब्ध आहेत.त्यामध्ये 'रवींद्रनाथ : तीन व्याख्याने, 'मित्र हो!', 'श्रोते हो', 'रसिक हो!', 'सृजन हो!' या संग्रहांचा समावेश आहे.

पु.लं. नी स्वचित्रण किंवा स्वप्रकटीकरण अनेक साहित्यकृतींमधून केले आहे. विशेषतः 'पुरचुंडी' या लेखसंग्रहामधून पु. ल. देशपांडे यांनी 'स्व' चे विविध कंगोरे, स्वभाव, आवडी–निवडी, लेखननिर्मितीप्रक्रिया या विषयी संक्षेपाने मांडले आहे. त्याचप्रमाणे 'मैत्र' या व्यक्तिचित्रण पुस्तकामधून त्यांनी तत्कालीन मान्यवर प्रतिथयश कलावंत, साहित्यिक, संगीत व कला क्षेत्रातील संबंधित अशा ज्येष्ठ–श्रेष्ठांची व्यक्तिचित्रणे लिहिली आहेत. पु. लं. नी उभे केलेली स्वचित्रणे आणि त्यांनी उभी केलेली व्यक्तिचित्रणे यांचा स्थूलमानाने शोध घेण्याचा प्रयत्न या छोट्या शोधनिबंधामध्ये मी केला आहे.

## पु. लं. नी लिहिलेली स्वचित्रणे–

पु.ल. देशपांडे यांनी प्रसंगपरत्वे स्वचित्रण लिहिली आहेत. या स्वचित्रणामधून भाषिक, वैचारिक आणि कलादृष्ट्या वेगळी अनुभूती येते. 'पु. ल. देशपांडे' या लेखकाची आणि त्यामध्ये दडलेल्या अवलीया कलावंताची, गुणवंत खेळियाची वेगळीच ओळख वाचकांना होते. विनोद, विनोदकृती आणि 'स्व' या विषयी 'रामनगरी' पुस्तकाच्या प्रस्तावनेत पु. ल. देशपांडे लिहितात– ''विनोद' ही नुसती शैली नाही. ती वृत्ती आहे. तो 'स्व'भाव आहे. त्याला आधी स्वतःकडे पाहून हसण्याचा गुण लागतो. स्वतःला 'धाकटं होऊन जगावं लागतं!''[1] या मताप्रमाणे पु. ल. देशपांडे यांनी आपले जीवन आणि लेखन केलेले दिसते. अशा वृत्ती प्रकटनामधून 'पु. ल. देशपांडे' यांनी स्वतः केलेले 'स्वचित्रण' आपल्याला कळायला लागते.

'असे हे पु. ल.' या पुस्तकामधून डॉ. बालशंकर देशपांडे यांनी 'व्यक्तिदर्शन' या प्रकरणात पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्त्व उलगडवून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात– ''कोणत्यातरी एका गुणाच्या बाबतीत उत्कर्षाची परमसीमा गाठणारी अनेक माणसे महाराष्ट्राने पाहिली आहेत; पण अनेक गुणांचा समुच्चय घेऊन जन्माला आलेली पु. लं. सारखी व्यक्ती क्वचितच पहायला मिळाली असेल. आधुनिक वनस्पती शास्त्रज्ञ एकाच रोपट्यावर विविध रंगांची नि जातीची फुले उमलवून दाखविण्याची अजब करामत कधी–कधी करतात ना? पु. लं. चे आयुष्य म्हणजे नियतीने करून पाहिलेला असाच एक आश्चर्यकारक प्रयोग आहे, अशी एक गमतीची कल्पना कधी कधी माझ्या मनाला स्पर्शून जाते''[2] डॉ. बालशंकर देशपांडे यांनी पु. ल. देशपांडे यांच्या गुणांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे तो रास्त आहे.

पु. ल. देशपांडे यांनी आपल्या लेखांमधून, प्रस्तावनांमधून आणि दिलेल्या प्रकट किंवा लिखित मुलाखतींमधून स्वचित्रण केले आहे. यावर एक दृष्टिक्षेप टाकला तर पु.ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्त्व गुणांसह, वैचारिकतेसह अधिक सुस्पष्ट होईल असे वाटते.

साहित्यिक अंगाने पु.ल. देशपांडे यांच्या मुलाखती बऱ्याच आहेत. मात्र यामध्ये प्रा. फ. मुं. शिंदे आणि विद्याधर पुंडलिक यांनी घेतलेल्या मुलाखती महत्त्वाच्या आहेत. फ. मुं. शिंदे यांनी प्रश्न विचारला होता. ''आपण विनोदानं इतरांचं मन निर्मळ करून सोडणारे कलावंत आहात. विनोदानं सर्वस्पर्शी गांभीर्य आणि शौर्य जाणून घेण्याइतपत प्रगल्भता समाजात खरोखरच आहे का?'' या प्रश्नाचे उत्तर देताना पु. ल. देशपांडे यांनी उत्तर दिले होते ते असे– ''माणसाचं मन निखळ आणि निर्मळ करणं हे केवळ विनोदी साहित्यातच नाही तर सर्वच कलांचं काम आहे. विनोद हा मुख्यतः मानवी जीवनातल्या विसंगतीवर बोट ठेवतो. ती विसंगती खेळकर वृत्तीने दाखविण्यात येते किंवा दाखवायला हवी. नेहमीच ती वृत्ती दिसून येते असे नाही. हवा, पाणी, जमीन, प्रकाश, वारा ह्या संस्कारातून फुलणारं 'बी' होऊनही प्रकटतं, तसंच काटा होऊनही प्रकटतं. लेखकावरचे संस्कार हे त्या पंचमहाभूताचे मुळातल्या बीजावर होणाऱ्या संस्कारांसारखे असतात. आविष्कार होतो तो मात्र मुळातल्या बीजाचा. ते आनंद देणारं सुंदर फूल किंवा फळ होतं किंवा कडू कारलं होतं. कलेच्या अंतिम आविष्काराच्या बाबतीतही निसर्गाचा हाच नियम लागू पडतो. त्याच्या निर्मितीतून कित्येकदा त्यालाही नकळत त्याचे संस्कार आणि वृत्ती दिसून येते.''[3] पु. ल. देशपांडे यांचे मन असे स्वच्छ निखळ राहिल्यामुळे त्यांचे जीवन, साहित्यलेखन आणि एकंदरच जीवनप्रवास हा याच सुंदरतेकडचा निखळतेकडचा प्रवास असलेला दिसून येतो. दलित साहित्यातील साहित्यकृतींना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना याची साक्ष देत आहेत. पु. ल. देशपांडे यांचे हे 'व्यक्तिमत्त्व चित्रण' म्हणजे अंतरंगाचा स्वच्छ आरसा आहे.

कलावंताने, लेखकाने आपलं लेखन स्वातंत्र्य जपावं, निर्मिती स्वातंत्र्य जपावं हा कायम आग्रह त्यांनी धरलेला दिसतो. काही निर्मितीप्रकारांमध्ये यावर बंधने येतात म्हणून त्यांनी काही तत्त्वे स्वीकारली, ती पाळली. चित्रपटनिर्मितीच्या बाबतीतही असंच काहीसं झालेलं दिसतं. ''तुम्ही चित्रपटात का रमला नाहीत?'' या प्रश्नाला उत्तर देताना पु. ल. देशपांडे म्हणतात– ''चित्रपटात रमलो नाही याचं एकमेव कारण सांगतो. 'तुम्ही असं करा' अशी इतरांना आज्ञा देण्याइतकं माझं तिथं स्थान नव्हतं. त्यामुळे फार तडे जायला लागले. त्या तडजोडी मला मानवेनात, दिवसाचे चाळीस शॉटस् करा हे माझ्यासारख्याला कसं जमायचं हो! वास्तविक त्या काळात सिनेमांचे

करार माझ्या हाती असताना मी क्षेत्र सोडून दिलं."[4] पु. लं. ची ही प्रतिक्रिया. विद्याधर पुंडलिकांनी विचारलेल्या प्रश्नाला पु. लं. देशपांडे यांनी दिलेले हे उत्तर त्यांचे अंतरंग चित्रण करणारे आहे. साहित्य आणि निर्मिती, कलानिर्मिती आणि व्यवहार यामधील सहसंबंध, फरक व्यक्त करणारे आहेत.

पु. ल. देशपांडे यांनी आपली निखळता, सच्चेपणा जपण्यासाठी सत्याची कास धरली म्हणूनच त्यांच्या जगण्यातून आणि लिहिण्यातून वाईटावर प्रहार केलेले दिसतात ते विनोदाच्या माध्यमातून. कोणत्याही मंदिरात कधी न जाणारे पु. ल. देशपांडे कर्मकांड आणि अंधःश्रद्धा ठामपणे नाकारतात. समाजातील विषमतेमुळे निर्माण झालेली दुर्गंधीची घाण दाखवून देतात, समाजातील गरजवंत, उत्तम काम करणाऱ्या माणसांच्या आणि संस्थांच्या पाठीमागे ते ठामपणे उभे राहतात यामागे त्यांची हिच तात्त्विकता हाच निखळपणा आहे, हे दिसून येते. यामधून पु. ल. देशपांडे यांचे अंतरंग, स्वचित्र स्पष्ट होते. साहित्यिक आपल्याला आलेला अनुभव वस्तूसापेक्ष रीतीने किंवा व्यक्तिसापेक्ष रीतीने कलाकृतीतून मांडत असतो. वस्तूसापेक्षमध्ये समाजातील वास्तव, आलेला अनुभव साहित्यिक वस्तूनिष्ठपणे आपल्या कलाकृतीमधून मांडतो. इथे हे वास्तव महत्त्वाचे मानलेले दिसते म्हणून पु. ल. देशपांडे यांच्या एकंदर जीवनप्रवासामध्ये हे वास्तव सहसोबती असल्याचे दिसते.

साहित्यिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न, दलित साहित्यातील झालेली टीका, साहित्यिकांमधील गट–तट यावर पु. ल. देशपांडे यांनी आपली परखड मते वेळोवेळी मांडली आहेत. म्हणून विनोदी लेखक, चित्रपट अभिनेते, गीतकार, संगीतकार, नाट्यलेखक, प्रभावी वक्ता या विविध आविष्कारांमधून पु. ल. देशपांडे यांचे हेच रूप अधिकाधिक स्पष्ट होत गेलेले दिसते.

पु. ल. देशपांडे स्वतःकडे धाकटेपणा, कमीपणा, नम्रपणा घेत असले तरी त्यामागे त्यांचे मोठेपण, वैचारिक उंची, सर्वसमावेशकता आणि व्यापक मानवता, उदार दृष्टिकोन आहे हेच स्पष्ट होते. पु. लं. चे स्वचित्रणे ही हेच व्यक्त करते.

## पु. ल. देशपांडे यांनी उभी केलेली व्यक्तिचित्रणे–

'पुरचुंडी' आणि 'मैत्र' यामधून पु. ल. देशपांडे यांनी काही व्यक्ती चितारल्या आहेत. या व्यक्तिचित्रणामागे पु. ल. देशपांडे यांची खास शैली व्यक्त होते.

'मैत्र' मधून त्यांनी नानासाहेब गोरे, पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर, खानोलकर, शाहू महाराज, दादा धर्माधिकारी, जोत्स्ना भोळे, राम किंकर, वसंत सबनीस, या व्यक्तींविषयी लिहिले आहे. त्याचप्रमाणे काही पाश्चात्त्यांचीही व्यक्तिचित्रणे केली आहेत. त्यामध्ये पी. जी. वुडहाउस यांचा समावेश आहे. पु. ल. देशपांडे यांनी या व्यक्तींविषयी केलेल्या चित्रणांमधून त्यांची आगळी–वेगळी विनोदी शैली देखील नजरेत भरते.

'पुरचुंडी' या लेखनसंग्रहामधील लेख आत्मपर आहेत. स्वतःला केंद्रस्थानी ठेवून हे लेख लिहिलेले आहेत. यामध्ये 'बाळपणीचा काळ सुखाचा', 'सुरूवातीचे दिवस', 'न माळवणारे दिवस', 'पाऊस कधी असा, कधी तसा', 'आंबा पिकतो–रस गळतो','सर्व काही काही नाही' यामधून पु. ल. देशपांडे 'स्व' ला व्यक्त करताना दिसतात. 'मैत्र' मध्ये त्यांनी आपले मित्र वसंत सबनीस रेखाटले आहेत. 'स्नेहधर्मी वसंत सबनीस' या व्यक्तिचित्रणपर लेखात पु. ल. देशपांडे लिहितात– "मराठीतील ख्यातनाम विनोदी साहित्यिक श्री वसंत सबनीस अशासारख्या वसंताचा भारदस्त उल्लेख करून ह्या लेखाची सुरूवात करायला हवी, किंवा श्री वसंत सबनीस यांचे मराठी विनोदी वाङ्मयातले योगदान अशा मथळ्याने त्या भारदस्तपणाचा भार अधिक वाढवायलाही हरकत नाही. (पूर्वी मंडळी एखाद्या कामात भाग घेत; आता योगदान देतात) पण असली छापील, समारंभी भाषा वापरणे वसंताच्या बाबतीत मला शक्य नाही."[6] अशाप्रकारे वर्णन करून आपल्या मित्रामधील मैत्रीची सामान्य पातळीवरील संबंधाची ते जाणीव करून देतात. मोठ्या व्यक्तीमधील साधेपणा ते अगोदर अधोरेखित करतात.

राम किंकर याच्याविषयी पु. ल. देशपांडे म्हणतात– "राम किंकरदांना घाण्याचे बैलपण मानवलेच नसते. हा मोकळ्या माळावर हुंदडणारा बलिवर्द होता. तरूण वयात त्यांच्या कलेवर आणि मस्तपणावर मुग्ध झालेल्या तरूणी त्यांच्या जीवनात आल्या होत्या, पण ह्या आदिम प्रकृतीच्या, भणंग वृत्तीच्या कलावंताशी जन्माची लग्नगाठ बांधून राहण्याची ताकद असलेली अशी त्यात एकही पार्वती नव्हती."[7] असे सांगून राम किंकरांच्या सुरूवातीच्या आयुष्यावर प्रकाश टाकला आहे. आपले वास्तवाचे जगणे मोकळपणाने स्वीकारणाऱ्या आणि ते जाहिरपणे मान्य करणाऱ्या अवलीया कलावंताची कलावंत म्हणून जगण्याची पद्धती, त्यांचे तत्त्वज्ञान पु. ल. देशपांडे व्यक्त करतात. यातून मोठ्या माणसांच्या आयुष्यातील हे कंगोरेही समजून येतात. तर 'जोत्स्ना भोळे' नावाची बालमैत्रिण या व्यक्तिचित्रणपर लेखात ते लिहितात– "अशी एक मैत्रीण मला लाभली. जोडीने खेळणारी, गाणारी एखादा चांगला खाद्यपदार्थ केला असताना आठवण करणारी– नव्हे, न जाणो, पुढल्या दोन चार दिवसात टपकेल म्हणून म्हणून राखून ठेवणारी, स्वतःच्या कौतुकाच्या प्रसंगी 'का हजर राहिला नाहीस' म्हणून हुरहुरणारी आणि 'जादा बडबड

करू नकोस' तुझ्यापेक्षा मी वयाने मोठी आहे. तू अमूलतमूक केलंस ते मला आवडलं नाही म्हणून बजावून सांगणारी. जिच्या भेटीत या ना त्या कारणाने चिकटलेली मानाची बिरूदे गळून पडतात अशी मैत्रिण''[8] या वर्णनातून जोत्स्ना भोळे यांचे व्यक्तिमत्त्व मैत्रीसह व्यक्त होते, ही पु. ल. देशपांडे यांची खरी खासियत आहे.

दादा धर्माधिकारी यांची सत्याग्रही म्हणून ओळख करून देताना त्यांची जीवनदृष्टी, व्यापक विचारसरणी ते छोट्या–छोट्या घटनांमधून स्पष्ट करत जातात. हमीद दलवाईंचे वर्णन ते 'प्रखर सुधारक' म्हणून करतात. 'तलाक' पद्धतीमुळे ज्यांच्या आयुष्यात दुःखे वाट्याला आली. त्यांचे दुःख वाटून घेणारा भाऊ या रूपात ते हमीद दलवाईचे व्यक्तिचित्रण करतात. शाहू महाराजांना ते 'एक धिप्पाड माणूस' म्हणतात. ज्यांची कृती महान आहे, मूलभूत बदल करणारी आहे. ज्यांचे विचार विशाल आहेत अशा व्यापक, भारदस्त राजा अशी व्यक्तिरेखा ते उभी करतात.

खानोलकरांविषयी 'खानोलकरचे देणे' या व्यक्तिचित्रणपर लेखात ते म्हणतात– ''असे वाटते की, खानोलकर वर काही लिहू नये. त्याच्या पुस्तकातून जो खानोलकर आता हाती उरला आहे. त्यालाच आधार घेऊन एकटे बसावे. त्या पुस्तकातून त्यालाच बोलू द्यावे. त्याचेच ऐकत राहावे. त्याच्या त्या लोकविलक्षण अनुभवांची खोली गाठण्याची आपली ऐपत आहे की नाही ते अजमावीत राहावे.''[9] ह्या वास्तवातून या समंजस्यपणातून माडखोलकरांची व्यापकता, गंभीरता ते व्यक्त करतात. याचप्रमाणे त्यांनी 'पंडित विष्णू दिगंबर' या लेखातून पलुस्करांचे व्यक्तिचित्रण केले आहे. 'नानासाहेब गोरे : प्रफुल्ल होवोनि सुपुष्प ठेलें' या व्यक्तिचित्रणपर लेखातून नानासाहेब गोरे यांची निस्पृहता, साधेपणा, राजकारणामधील त्यांनी पाळलेली सुचिता या गुणांसह त्यांची ओळख करून दिली आहे. अशाप्रकारे हे 'मैत्र' त्यांनी व्यक्त केले आहे.

'पुरचुंडी' मधून पु. लं. स्वतःचा, स्वतःच्या मनाचा, समाजाचा, निसर्गाचा घटना घडामोडींचा भावनिक शोध वेध घेताना दिसतात. गतकाळातील आठवणींना हृदय उजाळा देतात. 'मला नाचणारे तरूण आवडतात' या लेखात ते म्हणतात– ''युगानयुगं माणसाला तारूण्यात जी आकर्षण वाटत आली आहेत तिच होती. पण आकर्षण सांगण्यापूर्वी तो काळ कसा होता ते सांगायला हवं. तारूण्यातला स्वप्नरंजनाचा काळ. प्राप्त परिस्थितीविरूद्ध बंडखोरीनं उसळून येण्याचा काळ. भोवतालचं वातावरण विलक्षण विसंवादी. क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीत कुटुंबात भांडणं, मतभेद, डोक्यात राख घालणं असले प्रकार. आपण जिवंत असताना पोरांनं मिशा काढल्या म्हणून त्याला घराबाहेर घालवून देण्याचा कर्मठ मूर्खपणा होता.''[10] अशा वातावरणाशी झगडणाऱ्या नाचऱ्या तरूणांना 'तुम्ही मला आवडता' असे पु. ल. देशपांडे सांगतात तेव्हा ते 'जनरेशन गॅप' भरण्याचा प्रयत्न करीत असतात. मागच्या पिढीने पुढच्या पिढीला समजावून घेण्याचे मार्ग ते सांगत असतात. म्हणून नाचणाऱ्या तरूणात पु. लं. जसे स्वतःचे प्रतिबिंब पाहतात, प्रतिभा पाहतात तशी प्रतिमा वाचकही तयार करत असतात. स्वप्रतिभा न्याहाळत असतात. यामधून एक समंजस वडिलधारा माणूस स्वतःला इतरांना समजावून घेत आहे असे वाटते. पु. ल. देशपांडे या स्व–शोधातून, स्वचित्रणातून तरूण पिढीच्या मनाचा ठाव घेताना दिसतात.

स्व–शोध 'स्व–चित्रण' करताना स्वतःचं आणि पावसाचं विलक्षण नातं त्यांनी सांगितलं आहे. ''पहिला पाऊस आणि इंद्रधनुष्य पाहण्याची उत्सुकता कधी संपू नये

रस्त्यातून बँड वाजत निघालेला पाहायची हौस संपली की बालपण संपलं असं समजावं आणि पाऊस आणि इंद्रधनुष्य पाहायची हौस खतम झाली की आपण जिवंत असूनही खतम झालो असं मानावं पाणी आणि गाणी यांचा संबंध नुसता यमकापुरता नाही? त्यांचं त्याहूनही सुंदर असं नातं आहे. पाण्यानं तहान भागते आणि गाण्यानं भ्रम हलके होतात ही झाली नुसती उपयुक्तता. ती तर पुरी झालीच पाहिजे. पण माणसाच्या जीवनाला उपयुक्ततेपलिकडचंही एक परिणम आहे. म्हणूनच पाऊस कल्पनेच्या वेलींनाही फुले आणतो.''[11] यामधून पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वामधील हळवेपणा, संवेदनशीलता, मनाची टवटवी व्यक्त होते.

'आंबा पिकतो रस गळतो' या लेखामधून पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वात दडलेले बालक, बालपणाचा काळ व्यक्त होतो. खरे तर प्रत्येक माणसाच्या मनामध्ये असे एक अवखळ बालक असते, बालपणाच्या आठवण? असतात चिंचा, बोरे, आवळे, कैऱ्या आणि आंबे यांच्यामुळे हे बालपण विविध चवींचे झालेले असते. या सर्व फळांच्या भोवती बालपणीची कितीतरी गाणी लपलेली असतात. आंबा हे त्याचे एक प्रतीक रूप आहे. ही झाडे, फळे म्हणजे आठवणींचा खजीना असतो. याविषयी पु. ल. देशपांडे म्हणतात, ''पिकलेल्या आंब्यांचे घोसच्या घोस मिरवत आता आमचा आंबा उभा असतो. क्वचित वळिवाचा पाऊस येऊन त्याला दणदणीत शॉवरबाथ देऊन जातो. पाच पन्नास फळं खाली पडतात. पण आंबा मात्र धुंदीत असतो. त्याच्या नसानसांतून वाहणारा रस त्या फळांतून गळताना त्याला दिसत असतो. आणि वळिवाच्या वादळी वाऱ्याबरोबर तो झुलायला लागला की ते घोसही झुकायला लागतात आता कोणी न खुडताच एक एक फळ दबवून खाली पडतं. त्या झुकण्यात आपण सफल झाल्याची एक कृतार्थता असते.''[12]

अशा स्वचित्रणामधून, व्यक्तिचित्रणामधून रूप, रस, रंग, गंध, प्राशन करून, ती धुंदी पुरेपुर अनभवून दुसऱ्यांना ती धुंदी चाखायला देणारे लेखक पु. ल. देशपांडे व्यक्त होताना दिसतो.

## संदर्भ–


1. नगरकर राम, रामनगरी (स्वकथन) मॅजेस्टिक, प्रकाशन, नववी आवृत्ती – जुलै 2004, पृ.9
2. देशपांडे बालशंकर, असे हे पु. ल. स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, सुधारित आवृत्ती 25 एप्रिल 2003, पृ.22 व 23
3. देशपांडे बालशंकर, उपरोक्त, पृ.116
4. देशपांडे बालशंकर, उपरोक्त, पृ.109
5. साबणे अपर्णा, लांडगे संदीप, मराठी साहित्यातील नवता यशोदीप पब्लिकेशन्स , पुणे, प्रथमावृत्ती 2018, पृ.11
6. पु. ल. देशपांडे, मैत्र मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती, 1966, पृ.164
7. पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ.135
8. पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ.122
9. पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ.40
10. पु. ल. देशपांडे, परचुंडी, मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती 1999, पृ.151
11. पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ.90
12. पु. ल. देशपांडे, उपरोक्त, पृ.89